आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in    मंगळवार दिनांक 13/10/2026    METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 218 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# मतदारयादीत नाव नोंदणीसाठी पुन्हा मुदतवाढ!

## एसआयआर मोहिमेंतर्गत नागरिकांना पुन्हा संधी




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**महाराष्ट्र : राज्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल तपासणी (एसआयआर) मोहिमेंतर्गत मतदारांना दिलासा देत केंद्रीय निवडणूक आयोगाने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना नाव नोंदविण्यासाठी, तसेच निवडणूक आयोगाकडून पाठविण्यात आलेल्या नोटिसांना उत्तर देण्यासाठी आता 26 ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. प्रारूप मतदार यादीतील नोंदींबाबत हरकती आणि दुरुस्त्यांसाठीही ही मुदतवाढ लागू असल्याचे सांगण्यात आले आहे.**

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार राज्यात गेल्या दोन महिन्यांपासून मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत 31 ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत यापूर्वीच्या मतदार यादीतील सुमारे दोन कोटी मतदारांची नावे वगळण्यात आल्याचे दिलेल्या माहितीत नमूद आहे. या नागरिकांना पुन्हा मतदार यादीत नाव नोंदविण्याची संधी देण्यात आली आहे.

मतदार यादीत नव्याने नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना क्रमांक 6 अंतर्गत आतापर्यंत 7 लाख 19 हजार 382 अर्ज दाखल झाले आहेत. मतदार यादीतील नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी नमुना क्रमांक 8 अंतर्गत 3 लाख 99 हजार 925 अर्ज, तर मतदार यादीतून नाव वगळण्यासाठी नमुना क्रमांक 7 अंतर्गत 18 हजार 748 अर्ज प्राप्त झाले आहेत.मात्र, राज्यातील मोहिमेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची चिंता व्यक्त करण्यात आली होती. प्रारूप मतदार यादी अंतिम करताना मोठ्या संख्येने पात्र मतदारांची नावे यादीबाहेर राहण्याची शक्यता लक्षात घेऊन मुदतवाढ देण्याची मागणी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून केंद्रीय निवडणूक आयोगाकडे करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना नोंदणीची आणखी एक संधी मिळावी, तसेच नोटिसांना उत्तर देण्यासाठी आणि प्रारूप यादीतील नोंदींबाबत हरकती मांडण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध व्हावा, हा मुदतवाढीमागील महत्त्वाचा उद्देश आहे. यापूर्वीच्या आदेशानुसार संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्याची मुदत संपणार होती. मात्र, आयोगाने आता ती 26 ऑक्टोबरपर्यंत वाढविली आहे.दरम्यान, देशभरात निवडणूक आयोगाच्या कामकाजावरून राजकीय आणि सार्वजनिक पातळीवर चर्चा सुरू असताना महाराष्ट्रातील मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर वगळली जाण्याची शक्यता हा संवेदनशील मुद्दा ठरला आहे. या पार्श्वभूमीवर मुदतवाढीच्या निर्णयाकडे महत्त्वाने पाहिले जात आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 13/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरीत मनसेची भव्य सह्यांची मोहीम!

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : निवडणूक आयोगाचे आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात भव्य सह्यांची मोहीम राबविण्यात आली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेत महाराष्ट्र सैनिक, पदाधिकारी आणि नागरिकांनी सहभाग घेत सह्यांद्वारे आपला पाठिंबा व्यक्त केला.**




केंद्रातील निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात मनसेने आक्रमक भूमिका घेत ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी या मोहिमेद्वारे केली. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि लोकशाही संस्थांच्या कामकाजाबाबत प्रश्न उपस्थित करत मनसेच्या वतीने ही मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमातून निवडणूक आयोगाच्या कारभाराविषयी आपली भूमिका जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न पक्षाने केला.ही सह्यांची मोहीम मनसेचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सचिन चिखले यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यावेळी शहरातील मनसेचे पदाधिकारी, महाराष्ट्र सैनिक तसेच शिवसेनेचे पदाधिकारीही उपस्थित होते. उपस्थितांनी सह्यांच्या माध्यमातून ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीला पाठिंबा दर्शविला.या मोहिमेत मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले, शिवसेनेचे शहरप्रमुख चेतन पवार, रुपेश पटेकर, राजू अवसरे, बाळा दानवले, रोमी सिंधु, अक्षय शिंदे, तुषार सोनटक्के, सागर बहुले, प्रमोद अडसुळे, संतोष यादव, दत्ता डांगे, प्रतीक कांबळे, वैभव फाळके, आकाश कांबळे यांच्यासह शहरातील विविध पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत आपली भूमिका मांडण्यासाठी मनसेने सह्यांच्या मोहिमेचा मार्ग स्वीकारला असून, ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी पक्षाच्या वतीने आंदोलनात्मक भूमिका घेण्यात आली आहे. पिंपरीतील या मोहिमेत नागरिकांचा सहभाग नोंदविण्यात आला.

# महानगरपालिकेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 44 व्या वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील प्रशासकीय इमारतीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी महापौर रवि लांडगे यांच्या उपस्थितीत प्रांगणातील अण्णासाहेब मगर यांच्या प्रतिमेस तसेच पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**



यावेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे,अतिरिक्त आयुक्त कुलदिप जंगम,तृप्ती सांडभोर,विक्रांत बगाडे,मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे,मुख्य लेखा परिक्षक प्रमोद भोसले,सह आयुक्त मनोज लोणकर,शहर अभियंता मनोज सेठीया,मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे,मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे,उप आयुक्त अण्णा बोदडे,सचिन पवार,व्यंकटेश दुर्वास,संदीप खोत,पंकज पाटील,सह शहर अभियंता बापू गायकवाड,विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी दत्ता सुर्यवंशी, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजुर्डे,उपाध्यक्षा सुप्रिया जाधव,महादेव बोत्रे तसेच विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या कार्याचे स्मरण करत महापालिकेच्या लोकसेवेला यावेळी उजाळा देण्यात आला.

औद्योगिक नगरीपासून आधुनिक आणि वेगाने विकसित होणाऱ्या शहरापर्यंतचा पिंपरी-चिंचवडचा प्रवास हा दूरदृष्टी, सातत्यपूर्ण विकासकार्य आणि नागरिकांच्या सहभागातून घडला असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.महानगरपालिकेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित रक्तदान शिबिराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमातून समाजाप्रती असलेली जबाबदारी अधोरेखित करण्यात आली.

वर्धापन दिनाचा आनंद साजरा करतानाच समाजहिताच्या उपक्रमांना प्राधान्य देण्याचा सकारात्मक दृष्टिकोन या आयोजनातून दिसून आला.रस्सीखेच स्पर्धेतून संघभावनेचे दर्शन; पैठणीच्या खेळाने वाढवली रंगत वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांदरम्यान झालेली रस्सीखेच स्पर्धा विशेष आकर्षण ठरली. स्पर्धकांनी दाखवलेला उत्साह, जिद्द आणि संघभावना यामुळे कार्यक्रमात चैतन्य निर्माण झाले. दैनंदिन प्रशासकीय कामकाजाच्या जबाबदाऱ्यांमधून काही क्षण विरंगुळ्याचे मिळाल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्पर्धांचा आनंद घेतला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 13/10/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# महापालिकेच्या वतीने 'शून्य कचरा कार्यालय' उपक्रमाचा शुभारंभ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी: महापालिकेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाने 'शून्य कचरा कार्यालय' या उपक्रमाची सुरुवात करून इतर कार्यालयांसमोर आदर्श निर्माण केला आहे. पिंपरी चिंचवडसारख्या झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरात कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे हे मोठे आव्हान आहे.**



अशा परिस्थितीत प्रत्येक कार्यालयाने स्वतःच्या स्तरावर अशा पद्धतीने पुढाकार घेऊन कचऱ्याचे वर्गीकरण आणि योग्य विल्हेवाट लावण्यास सुरुवात केल्यास या आव्हानावर मात करण्यास मदतहोईल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी व्यक्त केले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त चिंचवड येथील झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाच्या मुख्य कार्यालयात 'शून्य कचरा कार्यालय' या उपक्रमाचा शुभारंभ अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि विक्रांत बगाडे यांच्या हस्ते करण्यात आला.

शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासह कार्यालयीन स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण, योग्य विल्हेवाट आणि पर्यावरणपूरक सवयी रुजविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्तांनी चिंचवड येथील कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पालाही भेट देऊन तेथील प्रशिक्षण उपक्रमांची पाहणी केली.

यावेळी उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त दशरथ कांबळे, कार्यकारी अभियंता शेखर गुरव, आसरा फाऊंडेशन अध्यक्षा अर्चना मोरे, कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्प व्यवस्थापक अमृता बहुलेकर, आयपीसीए प्रतिनिधी दत्ता हेंद्रे, वैभव नसुरडे, आशिष कुंभलकर तसेच महापालिका कर्मचारी आणि लाईटहाऊस प्रकल्पातील प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी शून्य कचरा कार्यलिय उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना महापालिकेच्या इतर कार्यालयांमध्येही ही संकल्पना राबविण्याची गरज व्यक्त केली. तसेच कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पाच्या माध्यमातून युवकांना रोजगारक्षम बनविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा आढावा घेत, रोजगाराच्या बदलत्या संधींनुसार प्रशिक्षण अधिक परिणामकारक करण्याबाबत सूचना केल्या.

# ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांचे निधन!

## लोककलेचा बुलंद आवाज हरपला!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : मराठी चित्रपटसृष्टी, लोकनाट्य आणि लावणीच्या रंगमंचावर आपल्या अस्सल अभिनयाने स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री आणि प्रसिद्ध लावणी कलावंत मधू कांबीकर यांचे पुण्यात निधन झाले. त्या 73 वर्षांच्या होत्या. दीर्घ आजाराने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या सुनेने निधनाची माहिती दिली. गेल्या काही वर्षांपासून त्या आजारपणामुळे अंथरुणाला खिळून होत्या. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजनविश्वातील एका समर्थ अभिनेत्रीचा आणि लोककलेच्या परंपरेशी घट्ट नाळ जोडलेल्या कलावंताचा प्रवास संपला आहे.**



मधू कांबीकर यांच्या निधनाने केवळ चित्रपटसृष्टीचे नुकसान झालेले नाही, तर ग्रामीण महाराष्ट्रातील लोककलेला व्यापक ओळख मिळवून देण्यासाठी आयुष्यभर योगदान देणाऱ्या एका महत्त्वाच्या कलावंताला आपण मुकलो आहोत. कांबी गावाशी जोडलेले त्यांचे बालपण आणि ग्रामीण संस्कृतीतून झालेली जडणघडण त्यांच्या कलाप्रवासाचा महत्त्वाचा भाग ठरली. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने कांबी गावासह संपूर्ण कला क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.मधू कांबीकर यांचा जन्म 28 जुलै 1953 रोजी बीड जिल्ह्यातील माळेगाव खुर्द येथे झाला. त्यांचे मूळ नाव मधू वामन जाधव असल्याचे चरित्रात्मक नोंदींमध्ये नमूद आहे. अहमदनगर जिल्ह्यातील कांबी गावात त्यांचे बालपण गेले.

ग्रामीण भागातील लोककला, तमाशा, लावणी आणि लोकनाट्याच्या वातावरणातून त्यांच्या कलाप्रवासाला दिशा मिळाली.औपचारिक शिक्षण सातवीपर्यंत झाले असले, तरी प्रत्यक्ष रंगमंच हा त्यांच्या अभिनयाचा खरा विद्यापीठ ठरला. निरीक्षणशक्ती, मेहनत, अभिनयातील सहजता आणि भूमिकेतील भावविश्व समजून घेण्याची क्षमता या गुणांच्या जोरावर त्यांनी मनोरंजनविश्वात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले.ग्रामीण भागातून आलेल्या महिला कलावंतांसाठी त्या काळात चित्रपटसृष्टीत स्वतःची ओळख निर्माण करणे सोपे नव्हते. मात्र, मधूताईंनी आपल्या अभिनयाच्या जोरावर ही मर्यादा ओलांडली. लोककलेतील अनुभवाचा उपयोग करून त्यांनी रंगभूमीपासून रुपेरी पडद्यापर्यंत विविध माध्यमांत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 13/10/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# अनुराधा ओक, प्रियांका इंगळे यांना 'तेजस्विनी' पुरस्कार

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पुणे : महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या 28 व्या पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाचे उद्घाटन मंत्री उदय सामंत यांच्या पत्नी, अभिनेत्री व दिग्दर्शिका नीलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते सोमवारी (ता. 12) शिवदर्शन येथील श्री लक्ष्मीमाता मंदिर प्रांगणात झाले. यावेळी बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक आणि भारतीय महिला खो-खो संघाची कर्णधार प्रियांका इंगळे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'तेजस्विनी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**



महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर युवा कलाकारांनी 'आई गिरीनंदिनी' या देवीगीतावर नृत्य सादर केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. हा महोत्सव 12 ते 18 ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

यंदा बालभारती संस्थेच्या स्थापनेचे 60 वे वर्ष सुरु असून, संस्थेच्या संचालिका अनुराधा ओक यांनी शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार स्वीकारला. तसेच पहिल्या महिला खो-खो विश्वचषक स्पर्धेत विजेतेपद मिळवणाऱ्या भारतीय महिला संघाची कर्णधार प्रियांका इंगळे हिचाही गौरव करण्यात आला. पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह, देवीची प्रतिमा, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. याशिवाय 150 हून अधिक गुरुजनांचा स्मृतिचिन्ह आणि भेटवस्तू देऊन प्रातिनिधिक स्वरूपात सन्मान करण्यात आला.

नीलम शिर्के-सामंत यांनी मिश्किल शैलीत संवाद साधत महिलांना स्वतःच्या क्षमतांची जाणीव ठेवण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, "प्रत्येक महिलेच्या अंगात नवदुर्गा असतात. त्यांची जाणीव होणे आणि गरजेनुसार त्या शक्तीचे योग्य रूप दाखवणे आवश्यक आहे. महिलांवर अनेक ताण असतात; मात्र हसतमुख राहून जीवनातील आनंद शोधला पाहिजे. हसण्याची एकही संधी सोडू नका. महिलांनी दिवसातून किमान 15 मिनिटे स्वतःसाठी द्यावीत. आपल्याला करावेसे वाटते, पण आजवर करता आले नाही, अशी एखादी गोष्ट करण्यासाठी हा वेळ वापरावा."

महिलांनी महिलांसाठी मोठे व्यासपीठ निर्माण करणे ही अभिमानाची बाब असल्याचे सांगून त्यांनी रंगभूमीच्या माध्यमातून राज्यातील अडीच ते तीन लाख मुलांसाठी काम करत असल्याचे नमूद केले. मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी राज्यभर प्रयत्न सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले.

# प्रतिभा ज्युनिअर कॉलेजच्या महाविद्यालयीन स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

## 19 शिक्षण संस्थांतील 177 विद्यार्थ्यांचा सहभाग

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**चिंचवड : चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ज्युनिअर कॉलेज, यांच्या वतीने आयोजित पिंपरी चिंचवड शहराअंतर्गत आंतरशालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, भाषिक कौशल्ये विकसित करणे आणि सकारात्मक स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे या उद्देशाने वक्तृत्व, निबंधलेखन, कथाकथन आणि एकपात्री नाटक अशा चार स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये एकूण 19 शैक्षणिक संस्थांमधील 177 विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपली प्रतिभा, सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि अभिव्यक्ती कौशल्यांचे प्रभावी सादरीकरण केले. त्याचे उद्घाटन प्रतिभा ज्यूनिअर कॉलेज्या प्राचार्या डॉ . वनिता कुऱ्हाडे समवेत प्रथम नोंदणी करणाऱ्या शिक्षीका तनीषा आंबरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले .

**स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे -**

वक्तृत्व स्पर्धात प्रथम क्रमांक - कु. रविना चौधरी आणि कु. वेदिका विभूते

द्वितीय क्रमांक - कु. सोनाली वाघमारे, तृतीय क्रमांक - कु. सिद्धी माने

निबंध लेखन स्पर्धात प्रथम क्रमांक - कु. जोहा सुलतान मोमीन आणि कु. श्रुती समर्थ स्वामी

द्वितीय क्रमांक - कु. श्रुती बिरादार

तृतीय क्रमांक - कु. गौरी राजू लष्करे, कथाकथन स्पर्धात प्रथम क्रमांक कु. अनुष्का मौर्या

द्वितीय क्रमांक - कु. सुजाता सरोज आणि कु. अंकिता वरुण

तृतीय क्रमांक - कु. सलोनी कांबळे

एकपात्री नाटक स्पर्धात प्रथम क्रमांक - कु. ऐश्वर्या यादव

द्वितीय क्रमांक - कु. नव्या सिंह

तृतीय क्रमांक - कु. कुंजन भाटी

सदर स्पर्धांचे परीक्षण डॉ. सुवर्णा गायकवाड, डॉ. महिमा सिंह , डॉ. सुवर्णा गोगटे, प्रा. गीता कांबळे, प्रा. सुशील भोंग, डॉ. राजश्री ननावरे, डॉ. संतोष उमाठे आणि प्रा. अमोल पाटील यांनी केले. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे सखोल मूल्यमापन करून त्यांच्या गुणवत्तेला योग्य न्याय दिला.

कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, संस्थेच्या खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा, यांच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या अशा शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांना प्रेरणा मिळत असल्याचे प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांनी उद्घाटन प्रसंगी सांगितले. त्याच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धांचे नियोजन करण्यात आले . भाषा विभाग प्रमुख प्रा. सुरेखा कुंभार व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना विचार प्रभावीपणे मांडण्याची, भाषेवरील प्रभुत्व वाढविण्याची, कल्पकतेला वाव देण्याची आणि आत्मविश्वासाने व्यक्त होण्याची संधी मिळाली. सर्व विजेत्या व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रवींद्र निरगुडे यांनी केले, तर प्रा. स्नेहल साळवी यांनी आभार प्रदर्शन केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968